# फिलाडेल्फिया अधिवेशन केवळ १३ महिने दूर... जून मधील ठळक घडामोडी

किरण जोगळेकर व मिलिंद रानडे , वृत्त व मंडळ समन्वय गट

फिलाडेल्फिया, १ जूनः मागील महिन्याच्या वृत्तामध्ये फिलाडेल्फिया अधिवेशना साठी अगदी जवळच्या ११०० हॉटेल रूम्सचा करार करून झाल्याची बातमी वाचल्यावर येणाऱ्या अनेक कुटूंबांनी ह्या रूम्स कधी पासून राखून ठेवता येईल अशा आशयाचे प्रश्न विचारले आहेत. त्याचा खुलासा करीत आहोत. फिलाडेल्फिया अधिवेशनासाठीची नोंदणी जानेवारी २००९ पासून सुरू होईल. नोंदणी केल्यावर मिळालेला नोंदणी क्रमांक वापरूनच आपण निवडलेल्या केवळ एका हॉटेलमध्ये सवलतीच्या दरामध्ये रूम राखून ठेवू शकाल. त्यासाठी १ रात्रीचे परत न मिळणारे भाडे भरावे लागेल. डुप्लिकेट बुकिंग झाल्यास, अधिवेशन समिती आपल्या अधिकाराचा वापर करून तत्सम बुकिंग नाकारू शकेल किंवा सवलतीचा दर नाकारू शकेल.

ह्या तरतूदींमुळे, जेव्हढ्या आधी सर्वांनी अधिवेशनासाठी नोंदणी केली त्याच क्रमाने त्यांना जवळच्या हॉटेलमधील रूम्स राखून ठेवता येतील. नोंदणी सुरू होण्याच्या दिवसापर्यंत देणगी देणाऱ्या कुटूंबांना सर्वात आधी नोंदणी क्रमांक मिळेल व त्यामुळे त्यांना अधिवेशन स्थळालाच लागून असलेल्या मॅरियट हॉटेल मधील रूम्स घेता येतील. त्यामुळे, देणगी देण्याची ईच्छा असणाऱ्या सर्व मंडळींनी लवकरात लवकर आपापली देणगी पाठवून निराशा टाळावी. ह्याच वृत्तामध्ये दुसऱ्या पानावर निधीसंकलन समितीने ठरविलेल्या देणगी पॅकेजेसची माहिती दिली आहे. फिलाडेल्फिया, न्यूजर्सी येथील दात्यांनी दिला तसा देणग्यांचा भरघोस प्रतिसाद इतर राज्यातील संपन्न मराठी कुटूंबेदेखील देतील अशी अशा आहे.

स्वागत समितीने टेंपल युनिव्हर्सिटीचे होस्टेल तीन दिवसांसाठी राहण्यासाठी मिळेल काय याची चाचपणी सुरु केली आहे. सव्वीस तारखेचा निधी संकलन कार्यक्रम हा समितीच्या सर्व कार्यकर्त्यांसाठी प्रशिक्षण वर्गाप्रमाणेच होता. स्थायी समितीने पार्किंगसाठी आणि लोवज् हॉटेलशी अजून २०० ते ३०० रूम्ससाठी बोलणी सुरू केली आहेत.

अर्थसमितीकडे इतर समित्यांकडून खर्चाची अंदाजपत्रके येण्यास सुरुवात झाली आहे. फिलाडेल्फिया मराठी मंडळाचे २००६ चे आयकर पत्र भरण्यात आले असून मंडळाला आयकर खात्याकडून करमाफी मिळाली आहे. आता अधिवेशनासाठी विक्रीकरातून सूट मिळावी यासाठी करसल्लागारांशी विचारविनिमय सुरु आहे.

खाद्य समितीने अरामार्कशी विस्तृत करार केला आहे. विविध केटरर्स शी बोलणी सुरू झाली आहे. त्यासाठीची निविदा वेबसाईटवर पाहू शकल. मुंबई चित्रपटसृष्टीतून सजावटीसाठी खास साहित्य आणता येईल का याची चाचपणी सजावट समिती सुप्रसिद्ध कलादिग्दर्शक नितीन देसाई यांच्याकडे करत आहे त्याच बरोबर अमेरिकेतील किशोर पाठारे यांच्याशीही नेपथ्याबाबत बोलणी चालू आहेत.

दृक् श्राव्य आणि प्रकाश समितीने आवश्यक साहित्यासाठी निविदा मागवल्या आहेत. प्रदर्शन समितीने भारतातील सहा मार्केटिंग कंपन्याना करारपत्रे पाठवली आहेत. प्रदर्शनातल्या स्टॉल्सचे आकार निश्चित करण्यात आले आहेत. प्रदर्शनाच्या संकल्पचित्राला अंतीम रुप देण्यात येत आहे. प्रदर्शना मधील स्टॉल्सच्या विक्री साठी राजा राणी, केसरी आणि अन्य संस्थांशी एजंसी कराराकरिता संपर्क स्थापित झाला आहे. ट्रॅव्हल कंपन्यांशी देखील भारतातून येणाऱ्या मंडळींसाठी टूर पॅकेजेस करण्याच्या करारावर चर्चा सुरु आहे.

भारतीय कार्यक्रम समितीला मिळालेले ६० ते ७० प्रस्ताव विचाराधीन आहेत. समिती अनेक मान्यवर कलाकारांच्याही संपर्कात आहे. अमेरिकेतील कार्यक्रमाचे २० ते २५ प्रस्ताव समितीकडे आले आहेत. अमेरिकेतील सर्व मराठी मंडळांना व कला संस्थांना कार्यक्रमाचे प्रस्ताव सादर करण्यासाठी समिती आग्रहाची विनंती करीत आहे व त्याच बरोबर अधिवेशन समितीने दिलेल्या विषयावर आपण एखादा कार्यक्रम उभा करू शकाल काय ह्या बद्दल सुद्धा कळवावे.

व्यावसायिक प्रशिक्षण समिती इतर परिषदांसोबतच दंतवैद्यांच्या परिषदेचीही शक्यता पडताळून पाहात आहे. डॉ.जान्हवी राणे व डॉ. मयेकर यांवर ह्या कार्यक्रमाचे नेतृत्व सोपविण्यात आले आहे. उद्यम परिषदेच्या कार्यक्रमाची देखील रुपरेषा आखून झाली आहे.

मीडीया व प्रचार समितीने संमेलनाच्या प्रायोजकांसाठी सवलतींचा मसुदा तयार केला आहे. किरण जोगळेकर यांच्याकडे मीडिया व प्रचार समिती व सर्व मराठी मंडळे यांच्यातील समन्वयाचे काम सोपविण्यात आले आहे. कालनिर्णयच्या खास तयार केलेल्या विशेष आवृत्तीचे अधिवेशनाच्या जाहिरातीसाठी मोफत वितरण यावर्षीच्या गणपती, दिवाळी, संक्रांत उत्सवात दहा हजार मराठी कुटुंबांत करण्यात येईल. अधिवेशनाची जाहिरात अशाप्रकारे आगळयावेगळया तऱ्हेने सर्व मराठी कुटुंबांपर्यंत पोहोचवण्यात येईल.

शिशू कार्यक्रम समितीने संमेलनाचा खर्च वाचवण्यासाठी एक अभिनव कल्पना मांडली आहे. विविध कार्यक्रमामध्ये मग्न झालेल्या बाळगोपाळांच्या देखरेखीचे काम पगारी लोकांबरोबरच, २ ते ४ तासांसाठी बहूतांशी पालकांनी पाळीपाळीने जर पार पाडले तर फार मोठा खर्च वाचू शकेल. पालक अधिवेशन स्थळीच असल्याने हे कायदेशीर असेल. त्यामुळे लहान मुलांचे प्रवेश शुल्क कमी करता येईल व तरूण कुटूंबांना अधिवेशनास येणे परवडू शकेल.

युवा समितीचे प्रतिनिधी सॅन फ्रॅन्सिस्कोच्या मैत्र अधिवेशनाला उपस्थित राहतील व आपल्या२००९च्या अधिवेशनाची जाहिरात, प्रचार प्रसार करतील.

नोंदणी समितीने अधिवेशनाला उपस्थित राहणाऱ्यांच्या सोयीसाठी इंटरनेटवरील अर्ज तयार केले आहेत. वेबसाईट टीमच्या सहकार्याने इंटरनेटवरच क्रेडिट कार्ड, इ–चेक, एसीएच सुविधेच्या सहाय्याने नावनोंदणी शुल्क भरता येईल याची व्यवस्था करण्यात येत आहे. अधिक माहिती अधिवेशनाच्या संकेत स्थळावर www.BMM2009Philadelphia.org वर मिळेल.